नि.फौ.मा.क्र. १४२/२०१९
सरकार -वि- गर्दीश +३
**न्यायनिर्णय नि.क्र. ५७**

| | |
|---|---|
| दाखल तारीख | ११/१२/२०१९ |
| नोंदणी तारीख | ११/१२/२०१९ |
| निकाल तारीख | ०६/०४/२०२६ |
| कालावधी | ०६वर्षे,०३म.,२६दि. |

**भाग अ**
**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**
**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)}**

| | |
|---|---|
| | **निशाणी क्र.५७** |
| **कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी यांचे न्यायालय**<br>पिठासीन अधिकारी :- योगेश्वर ज. वळवी | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. ४४४/२०१९<br>चामोर्शी पोलिस ठाणे. |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६/०४/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | नियमित फौजदारी खटला क्रमांक १४२/२०१९ |
| | CNR No. **MHGA090010482019** |
| तक्रारकर्ता /अभियोग | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी, पोलिस ठाणे चामोर्शी. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री.एस.एस.सलामे**<br>(सहायक सरकारी वकील) |
| आरोपी | १. गर्दीश सोमेश्वर आत्राम,<br>वय-२७ वर्ष, व्यवसाय- मजुरी,<br>२. मनोज दादाजी उंदिरवाडे,<br>वय-३७ वर्ष, व्यवसाय- शेती,<br>४. मंगला देवानंद वालदे,<br>वय-४४ वर्ष, व्यवसाय- किराणा दुकान,<br>सर्व रा. चामोर्शी, ता. चामोर्शी,<br>जि.गडचिरोली. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. ए. जे. उंदिरवाडे**<br>(आरोपींतर्फे वकील) |

**भाग ब**
**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)}**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १८/११/२०१९ |
| पहिल्या खबरीची तारीख | १९/११/२०१९ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ११/१२/२०१९ |
| दोषारोपनिश्चिती तारीख | २९/०१/२०२० |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ०३/०३/२०२१ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०६/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६/०४/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | --- |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>४. | गर्दीश सोमेश्वर आत्राम,<br>मनोज दादाजी उंदिरवाडे,<br>मंगला देवानंद वालदे,, | --- | ११/१२/२०१९ | भा.दं.वि चे कलम २९४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | लागु नाही. | निरंक |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १९७२ | **पुरावा अधिनियम** |

**भाग क**

**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (३)}**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.कं. १ | प्रकाश देवनाथ उंदिरवाडे | पंच |
| सा.कं. २ | विदया प्रकाश उंदिरवाडे | फिर्यादी |
| सा.कं. ३ | नागभुषण शंकर वालदे | पंच |
| सा.कं. ४ | प्रज्ञा नागभुषण वालदे | साक्षदार |
| सा.कं. ५ | शालीकराम गंगाधर गिरडकर | तपासी अधिकारी |

**ब. <u>बचाव साक्षीदार, असल्यास</u> :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा स्वरूप |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा स्वरूप |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

## सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणीची यादी

**अ. सरकारपक्ष :**

| अ.क्रमांक | निशानी क्रमाक | विवरण |
|---|---|---|
| १ | निशाणी/**पी-२६**/सा.क्र.१ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| २ | निशाणी/**पी-२८**/सा.क्र.२ | फिर्यादवरील सही |
| ३ | निशाणी/**पी-३१**/सा.क्र.३ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| ४ | निशाणी/**पी-४८**/सा.क्र.५ | घटनास्थळ पंचनामा |
| ५ | निशाणी/**पी-४९ ते ५२**/सा.क्र.५ | आरोपीचे चेहरेपटटी फार्म |
| ६ | निशाणी/**पी-५३**/सा.क्र.५ | साक्षदार क्र. ४ प्रज्ञा वालदे हिचे बयाणावरील अधारेखांकित भाग अ |

**ब. बचावपक्ष :**

| अ.क्रमांक | निशानी क्रमाक | विवरण |
|---|---|---|
| **--निरंक--** | | |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्रमांक | निशानी क्रमाक | विवरण |
|---|---|---|
| **--निरंक--** | | |

**ड. महत्वाच्या वस्तु :**

| अ.क्र. | निशानी क्रमाक | विवरण |
|---|---|---|
| | **--निरंक--** | |

## न्यायनिर्णय

( दिनांक ०६ एप्रिल २०२६ रोजी घोषीत)

१. आरोपींवर भारतीय दंड संहितेचे कलम २९४ व ५०६ सह कलम ३४

अन्वये आरोप ठेवुन खटला चालविण्यात आला.

२. <u>अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त रुपात खालीलप्रमाणे आहे</u> :

अ) विदया प्रकाश उंदिरवाडे हिने पोलीस स्टेशन, चामोर्शी येथे खबर दिली की, दि.१७/११/२०१९ रोजी आंबेडकर वार्डातील महिलांनी प्रशांत भैसारे हा अवैध हातभटटी मोहादारु विक्री करीत असताना त्यास पकडुन पोलिस स्टेशन चामोर्शी येथील पोलिस कर्मचारी यांचे स्वाधीन करुन दिले होते. दिनांक १८.११.२०१९ रोजी सकाळी ०५:०० वाजता आरोपी क्र. १ ते ३ हे विदया किराणा दुकानाचे जवळ एकत्र जमुन त्यांनी दारुबंदी समितीच्या महिलांना उददेशुन ''भोसळया रांडा आमची दारु पकडायला आल्या त्यांना हेपुन टाकतो'' असे आरोपी क्र. २ हा म्हणाला. आरोपी क्र. ३ प्रशांत एकनाथ भैसारे हा फिर्यादीच्या घरी येवुन तुम्ही आता झोपता काउन माझी दारु पकडल्या त्याचप्रमाणे सगळयाची दारु पकडा लालडोंगरीवर चला असे म्हणुन शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपी क्र. ४ ही रोडवर येवुन त्यांना दारुबंदी महिलांना उददेशुन ''नकटया रांडा आमची दारु बंद केली आता लालडोंगरीवर चालु आहे, ते दिसत नाही का? यांच्या गांडीमध्ये दम असेल तर लालडोंगरीवरची दारु पकडुन दाखवावी'' अशी शिवीगाळ केली. तसेच आरोपी क्र. ३ हा लहान मुलांना ''त्याच्या घ राकडे खेळायचे नाही तुमच्या आई आमची दारु पकडतात तुम्ही इकडे खेळायला आले तर तुमचा गळा कापुन टाकीन'' असे म्हणुन शिवीगाळ केली.

३. सदर तोंडी रिपोर्टवरून पोलिस स्टेशन चामोर्शी येथे भा.दं.वी चे कलम २९४ व ५०६ सह कलम ३४ नुसार अपराध क्र. ४४४/२०१९ अन्वये आरोपीच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर ए.एस.आय. शालीकराम गिरडकर यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी आरोपींना अटक करुन त्यांचा अटक फार्म तयार केला. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे बयान नोंदविले. तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २९४ व ५०६ सह कलम ३४ अन्वयेच्या गुन्हयासाठी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २९४ व ५०६ सह कलम ३४ नुसार नि.क्र.१७ वर आरोप निश्चित करण्यात आले. आरोपींना दोषारोप वाचुन व समजावून सांगीतले असता त्यांनी ते अमान्य केले व खटला पुढे चालविण्याची तयारी दर्शविली. खटला प्रलंबित असताना आरोपी क्र. ३ मयत झाल्याने त्याच्याविरुध्द खटला

संपुष्टात आला. अभियोग पक्षातर्फे एकुण ०५ साक्षदार तपासण्यात आले. फौ.प्र.सं.कलम ३१३ अन्वये आरोपी क्र. १, २ व ४ यांचा जबाब नि.क्र. ५४ ते ५६ प्रमाणे नोंदविण्यात आला. त्यात आरोपींचा बचाव नकाराचा आहे.

५. सरकारी पक्षाची हकीकत, अभिलेखावर आलेला तोंडी व लेखी पुरावा यावरुन निराकरणासाठी खालील मुद्‌दे उपस्थित होतात. सदर मुद्‌दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणासह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्‌दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १८/११/२०१९ रोजी सकाळी ०५.०० वाजताच्या सुमारास विदया किराणा स्टोअर्स चामोर्शी, तह.चामोर्शी, जि. गडचिरोली येथे आरोपींनी एकमेकाशी संगणमत करुन फिर्यादीला ''भोसळया रांडा आमची दारु पकडायला आल्या, त्यांना हेपुन टाकतो'' अश्या अश्लिल भाषेत शिवीगाळ केली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम २९४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी |
| २ | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी एकमेकाशी संगणमत करुन फिर्यादीच्या मुलाला मारण्याची धमकी देवुन धाकदपटशहा केला आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी |
| ३ | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

६. सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी वकील श्री. एस.एम.सलामे व आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.ए.जे. उंदिरवाडे यांचा युक्तीवाद ऐकला.

## मुददे क्रं. १ ते ३ करीता.

७. पंच साक्षीदार क्र. १ याने त्याच्या पुराव्यात सांगितले की, तो फिर्यादी व आरोपींना ओळखतो. पोलिसांनी त्याला पंच म्हणुन कुठेही बोलावले नव्हते व त्याच्या समक्ष कोणताही पंचनामा करण्यात आला नव्हता. सदर साक्षीदाराने घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही असुन त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहाय्य न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्याला फितुर घोषीत करुन सुचक प्रश्न विचारण्यात आले परंतु, त्याला विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नांना

त्याने नकारार्थी उत्तर दिले. त्यामुळे अभियोग पक्षाच्या बाजुने कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

८. पंच साक्षीदार क. ३ याने त्याच्या पुराव्यात सांगितले की, तो फिर्यादी व आरोपींना ओळखतो. पोलिसांनी त्याला पंच म्हणुन कुठेही बोलावले नव्हते व त्याच्या समक्ष कोणताही पंचनामा करण्यात आला नव्हता. सदर साक्षीदाराने घटनास्थळ पंचनामा त्याची सही असुन त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहाय्य न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्याला फितुर घोषीत करुन सुचक प्रश्न विचारण्यात आले परंतु, त्याला विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नांत त्याने मान्य केले की, दि. १९.११.२०१९ रोजी पोलिसांनी त्याला फुले वार्ड येथील विदया किराना दुकानाच्या समोर पंच म्हणुन बोलावले होते. त्याने मान्य केले की, पंचनामा बरोबर असल्यामुळे त्याने त्यावर सही केली व ती सही विदया किराणा दुकानासमोर केलेली आहे व दुसरा पंच म्हणुन प्रकाश उंदिरवाडे हजर होता. त्यानंतर त्याने नकारार्थी उत्तर दिले.

९. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान त्याने मान्य केले की, विदया किराणा दुकान हे त्यांच्या येण्या-जाण्याच्या रोडवर आहे. त्याने मान्य केले की, तो जात असताना पोलिसांनी त्याला थांबवुन लिखीत कागदपत्रावर त्याची सही घ ेतली. त्याने मान्य केले की, घटनास्थळावर पोलिसांनी काय लिखापढी केली हे त्याला माहित नाही.

१०. साक्षीदार कं.२ फिर्यादी हिने तिच्या पुराव्यात सांगीतले की, घटना अंदाजे सात-आठ महिण्यापुर्वी चामोर्शी येथील फुले वार्डीत पत्रु उंदिरवाडे यांच्या घरा समोर घडली होती. घटना काय घडली होती याबाबत तिला माहिती नाही. सदर साक्षीदाराने फिर्यादवर तिची सही असुन त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहाय्य न केल्याने अभियोग पक्षातर्फे तिला फितुर घोषीत करुन सुचक प्रश्न विचारण्यात आले परंतु, तिला विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नांना तिने मान्य केले की, सन २०१९ मध्ये ती आणि इतर महिला तिच्या मोहल्ल्यात दारुबंदीची मोहीम राबवीत होते. तिने मान्य केले की, दि. १७.११.२०१९ रोजी ती आणि इतर दारुबंदीच्या महिलांनी प्रकाश भैसारे याची दारु पकडुन दिली होती.

तिने मान्य केले की, प्रकाश भैसारे तिचे घरी आला होता. तिने मान्य केले की, प्रकाश भैसारे याने तिची दारु पकडली, त्याचप्रमाणे सगळयांची दारु पकडा, लालडोंगरीवर चला असे म्हटले होते.

११. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान तिने मान्य केले की, आरोपी व ती एकाच वार्डात राहत असल्याने ती त्यांना ओळखते. त्यानंतर तिने सुचक प्रश्नाला नकारार्थी उत्तरे दिली.

१२. साक्षीदार क्रं. ४ हिने तिच्या पुराव्यात सांगीतले की, घटना अंदाजे दोन वर्षापुर्वी घडली होती. घटनेविषयी तिला काहीही माहित नाही. पोलिसांनी तिचे बयाण घेतले नव्हते. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहाय्य न केल्याने अभियोग पक्षातर्फे तिला फितुर घोषीत करुन सुचक प्रश्न विचारण्यात आले. तिला विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नांत तिने मान्य केले की, सन २०१९ मध्ये ती, फिर्यादी विदया व मोहल्यातील दोन चार महिला मिळुन दारुबंदीसाठी कार्य करत होते. हे तिला माहित नाही की, त्यावेळेस विदया किराणा दुकानासमोर आरोपींनी त्यांना उददेशुन भोसडया रांडा आमची दारु पकडायला आल्या अशा अश्लील शब्दात शिवीगाळ केली व मंगला हिने सुध्दा त्यांना उददेशुन अश्लील शब्दात शिवीगाळ केली होती. तिचे बयाणातील अधोरेखांकित भाग अ पोलिसांनी का लिहीला याबाबतचे कोणतेही कारण तिला सांगता येत नाही. तिने मान्य केले की, आरोपीसोबत तिचे बोलणे-चालणे आहे. त्यानंतर तिने सुचक प्रश्नाला नकारार्थी उत्तरे दिली.

१३. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान तिने मान्य केले की, घटनेच्या दिवशी ती घटनास्थळावर हजर नव्हती. तिने मान्य केले की, घटनेच्या वेळेस कोणी कोणाला शिवीगाळ केली व घटना काय झाली याबाबत तिला माहित नाही.

१४. साक्षीदार क्रं. ५ तपासी अधिकारी यांनी त्यांच्या पुराव्यात सांगीतले की, दि. १९.११.२०१९ रोजी अप.क्र. ४४४/२०१९ चा तपास त्यांना मिळाला. त्यांनी गुन्हयातील कागदपत्रे घेवुन घटनास्थळी जावुन फिर्यादीला विचारपुस करुन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यांनी पंचाना सुचनापत्र देवुन बोलावले. त्यानंतर घटनास्थळ फिर्यादीने दाखविले व घटनास्थळ हे चामोर्शी येथे आंबेडकर

वार्डमध्ये रोडवर विदया किराणा स्टोअर्स समोर होते आणि तो सार्वजनिक रोड होता. तसेच त्यांनी पंचनामा नि.क्र. ४८ नुसार सिध्द केले. त्यांनी साक्षदारांचे जबाब नोंदविले, आरोपींचे चेहरेपटटी फार्म भरले. तसेच त्यांनी चेहरेपटटी फार्म नि.क्र. ४९ ते ५२ नुसार सिध्द केले. त्यानंतर आरोपींविरुध्द पुरावा मिळुन आल्याने कलम २९४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे दोषारोपपत्र तयार केले. त्यानंतर त्यांनी नि.क्र. ५३ नुसार साक्षीदार क्र.४ प्रज्ञा वालदे हिचा जबाब त्यांनी नोंदविला होता व तिच्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ तिच्या सांगण्याप्रमाणे बरोबर असल्याचे सांगितले. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान त्यांनी बचावाच्या सुचना नाकारल्या आहेत.

१५. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. साक्षदार क्र. २ ही या प्रकरणातील मुळ खबर देणार साक्षदार असुन तिने तिच्या पुराव्यात आरोपींनी तिला अश्लिल शिवीगाळ केल्याची बाब कथन केलेली नाही तसेच आरोपींनी दमदाटी केले असेही साक्षदार क्र. २ च्या पुराव्यात आलेले नाहीत. साक्षदार क्र. २ च्या पुराव्यात आरोपींनी भांदवी कलम २९४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे कथन केलेले नसल्याने आरोपीविरुध्द लावण्यात आलेले गुन्हयाचे घटक संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होत नाही. साक्षदार क्र. १ व ३ हे पंच साक्षदार असुन त्यांच्या समक्ष पंचनामा झाला नसल्याचे त्यांनी कथन केले आहे त्यामुळे घ टनास्थळ पंचनामा देखील संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होत नाही. साक्ष क्र. ४ ही अभियोग पक्षामार्फत तपासण्यात आलेली प्रकरणातील प्रत्यक्ष साक्षीदार असुन तिने देखील तिचे समक्ष कोणतीही घटना घडली नाही असे कथन केले आहे. साक्षदार क्र. ५ याच्या पुराव्याला साक्षदार क्र. १ ते ४ यांचा पुरावा बळकटी देणार नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपींवरील आरोप संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत करणारा नसल्याने आरोपींना संशयाचा फायदा देवुन निर्दोष मुक्त करणे उचित होईल म्हणुन मी मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र. ३ च्या निष्कर्षाच्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ गर्दीश सोमेश्वर आत्राम, आरोपी क्र. २ मनोज दादाजी उंदिरवाडे व आरोपी क्र. ४ मंगला देवानंद वालदे यांना भारतीय दंड संहिताचे कलम

२९४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते .

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/- चा नविन जमानती बंधपत्र दयावे. सदर बंधपत्राची मुदत पुढील सहा महिण्यापर्यंत राहील. सदर कालावधीत आव्हान न झाल्यास बंधपत्र रद्द होईल.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by YOGESHWAR VALVI
Date: 2026.04.06 17:19:01 +0530

दिनांक :-०६/०४/२०२६.

{वाय.जे.वळवी}
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.